# जाहिर सुचना

मा. उच्च न्यायालयाच्या जनहित याचिका क्र ७१/२०१३ मधील आदेश दि. १३.१०.२०२५ नुसार रस्त्यांच्या खड्ड्यांमुळे (Potholes/Manholes) झालेल्या अपघातामुळे मृत्यु अथवा शारिरीक इजा झालेल्या व्यक्तिंना नुकसानभरपाई निश्चित करून अदा करण्यासाठी मा. महानगर आयुक्त व सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे व रायगड यांची स्वतंत्र समिती स्थापन करण्यात आल्या आहे.

तरी जनतेस सुचित करण्यात येते की, वरील अनुषंगाने प्राधिकरणाच्या अखत्यारीत आलेल्या रस्त्यावरील खड्ड्यांमुळे व उघड्या मॅनहोलमुळे काही अपघातामध्ये कोणी जखमी झाल्यास अथवा अपघातामध्ये एखाद्यास जीव गमवावा लागल्यास त्यांनी किंवा त्यांचया नातेवाईकांनी खाली नमूद केलेल्या ठिकाणावर सर्व पुराव्यानिशी अर्ज सादर केल्यास अथवा प्राधिकरणाच्या वेबसाईटवर आपले अर्ज दाखल केल्यास माननीय मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार गठीत करण्यात आलेल्या समितीमार्फत योग्य ती कार्यवाही करून संबंधितास मोबदला अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल याची सर्व नागरिकांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**“प्रमुख अभियांत्रिकी, अभियांत्रिकी विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, २ रा मजला, मुंबई - ४०००५१”**

**दूरध्वनी क्र. - ०२२-६५९६४०३४**